मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# स्वातंत्र्य दिनानिमित्त भक्ती-शक्ती येथे राष्ट्रभक्तीचा जागर

## ‘वंदे मातरम्’ गायनास उत्स्फूर्त प्रतिसाद; देशभक्तीपर गीतांनी वातावरण भारावले

» पिंपरी | प्रतिनिधी

**स्वातंत्र्य दिनानिमित्त निगडी येथील भक्ती-शक्ती परिसरात आयोजित विविध देशभक्तीपर कार्यक्रमांमुळे राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रीय एकात्मतेचे वातावरण निर्माण झाले. YOUVAN संस्था आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सामूहिक ‘वंदे मातरम्’ गायन तसेच महानगरपालिकेच्या वतीने आयोजित देशभक्तीपर गीतांच्या कार्यक्रमास महापौर रवि लांडगे यांनी उपस्थित राहून सहभाग नोंदविला.**






बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी रचलेले ‘वंदे मातरम्’ भारतीय स्वातंत्र्यलढ्यात राष्ट्रप्रेम आणि स्वाभिमान जागविणारे प्रेरणागीत ठरले. स्वातंत्र्य चळवळीच्या विविध टप्प्यांवर या गीताने देशवासीयांना एकत्र आणत मातृभूमीप्रती समर्पणाची भावना दृढ केली. या ऐतिहासिक वारशाचे स्मरण आणि नव्या पिढीमध्ये राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता व कर्तव्यभावना वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने सामूहिक गायनाचे आयोजन करण्यात आले होते.

नागरिक, युवक आणि विद्यार्थ्यांच्या सहभागातून ‘वंदे मातरम्’चे सामूहिक स्वर भक्ती-शक्ती परिसरात घुमले. या उपक्रमाच्या आयोजनाबद्दल महापौर लांडगे यांनी YOUVAN संस्थेचे पदाधिकारी, स्वयंसेवक आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे अभिनंदन केले.

कार्यक्रमास आमदार अमित गोरखे, माजी आमदार अश्विनी जगताप, उपमहापौर शर्मिला बाबर, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, नगरसदस्य पंकज भालेकर, अतिश बारणे, जनता व संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह YOUVAN संस्थेचे पदाधिकारी व स्वयंसेवक, महानगरपालिकेचे अधिकारी-कर्मचारी, कलाकार, विद्यार्थी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने आयोजित या दोन्ही उपक्रमांतून राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, सांस्कृतिक अभिव्यक्ती आणि नव्या पिढीचा सहभाग यांचा प्रभावी संगम अनुभवायला मिळाला.

### देशभक्तीपर गीतांनी स्वातंत्र्य दिनाचा उत्साह द्विगुणित

याच पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या वतीने आयोजित देशभक्तीपर गीतांच्या कार्यक्रमात विविध कलाकारांनी राष्ट्रप्रेम जागविणाऱ्या गीतांचे सादरीकरण केले. महापालिकेतील प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळतानाच संगीत आणि गायनाची आवड जोपासणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनीही या कार्यक्रमात सहभाग घेतला. त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध झाल्याबद्दल महापौर लांडगे यांनी समाधान व्यक्त केले.कार्यक्रमात बालकलाकार ‘वंडर बॉय’ पृथ्वीराज सतीश इंगळे याने ‘मेरा जूता है जापानी’ हे गीत सादर केले. त्याच्या आत्मविश्वासपूर्ण आणि सुरेल सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महापौर लांडगे यांनी पृथ्वीराजचे विशेष कौतुक करून त्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

“स्वातंत्र्य दिन हा स्वातंत्र्यासाठी त्याग आणि बलिदान देणाऱ्या ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. ‘वंदे मातरम्’च्या सामूहिक स्वरांतून राष्ट्रप्रेम, एकात्मता आणि मातृभूमीप्रती असलेली कृतज्ञता अधोरेखित होते. नव्या पिढीच्या मनात राष्ट्रप्रेमासोबत राष्ट्रविकासातील आपली जबाबदारीही दृढ व्हावी, यासाठी अशा उपक्रमांचे विशेष महत्त्व आहे.”

-रवि लांडगे, महापौर, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

# विजयदुर्ग 'क' क्षेत्रीय कार्यालयात ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा!

» पिंपरी | प्रतिनिधी

**महानगरपालिकेच्या विजयदुर्ग 'क' क्षेत्रीय कार्यालय, भोसरी येथे देशाचा ८० वा स्वातंत्र्यदिन अत्यंत उत्साहात आणि सन्मानपूर्वक वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित ध्वजारोहण समारंभास उपस्थित राहून राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. राष्ट्रगीत आणि राज्यगीताच्या जयघोषात ध्वजारोहण संपन्न झाल्यानंतर एमएसएफ (MSF) जवानांनी सादर केलेले शिस्तबद्ध संचलन उपस्थितांचे लक्ष वेधून घेणारे ठरले.**





याप्रसंगी क क्षेत्रीय अध्यक्ष निखिल बोऱ्हाडे यांनी उपस्थित अधिकारी, कर्मचारी व नागरिकांशी संवाद साधताना देशाच्या प्रगतीसाठी स्वातंत्र्य मूल्यांची जपणूक आणि मूलभूत कर्तव्यांच्या पालनावर विशेष भर देण्यात आला.

देशाला स्वातंत्र्य मिळून ८० वर्षे पूर्ण झाली असली, तरी दैनंदिन जीवनातील मूलभूत नागरी कर्तव्ये पार पाडणे हीच खरी देशसेवा असल्याचे या वेळी नमूद करण्यात आले. वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन करणे, रस्त्यावर कुठेही कचरा न टाकता त्याचे योग्य वर्गीकरण करून तो कचरा गाडीतच देणे, अशा छोट्या-छोट्या नियमांचे नागरिकांनी पालन केले पाहिजे, असे आवाहन यावेळी त्यांनी आले.

तसेच, प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता आणि सुलभता आणण्यासाठी अधिकारी व नागरिकांमधील संवाद महत्त्वाचा असून, सर्व अधिकाऱ्यांनी नागरिकांचे प्रश्न समजून घेऊन त्यांची कामे मोकळ्या मनाने व योग्य रीतीने वेळेत पूर्ण करावीत, असेही त्यांनी सांगितले. राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सर्वांनी एकजुटीने योगदान देण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. या कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, पालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुरुवर्य अकॅडमी स्कूलमध्ये 80 वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा!

## ध्वजारोहणासह देशभक्तीपर कार्यक्रम; विद्यार्थ्यांनी घेतली राष्ट्रनिर्मितीची शपथ








» पिंपरी | प्रतिनिधी

**गुरुवर्य अकॅडमी स्कूलमध्ये भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन अत्यंत उत्साह, अभिमान आणि देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. या प्रसंगी विद्यार्थी, शिक्षक, पालक तसेच मान्यवर अतिथींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे आणि बलिदानाचे भावपूर्ण स्मरण केले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करून झाली. त्यानंतर 'वंदे मातरम्', राष्ट्रगीत, ध्वजगीत आणि राज्यगीताच्या सुमधुर सादरीकरणाने संपूर्ण परिसर देशभक्तीच्या भावनेने भारावून गेला.**

या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून सुभेदार दत्तात्रय गायकवाड, पोलीस हवालदार आनंद झुंगारे आणि अग्निशमन दलाचे अधिकारी किरण वाघमारे (COD) यांची विशेष उपस्थिती लाभली. तसेच शाळेचे संचालक भूषण मावळे सहसंस्थापक व सचिव अनिल बेलकेरी , कोषाध्यक्ष प्रसाद शेट्टी, मुख्याध्यापिका ज्योत्स्ना मावळे, ज्योती बेलकेरी, शुभा शेट्टी यांच्यासह सर्व विश्वस्त आवर्जून उपस्थित होते.

ध्वजारोहणानंतर शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. स्वातंत्र्यसैनिकांचा संघर्ष, शौर्य आणि त्याग प्रभावीपणे मांडणाऱ्या देशभक्तीपर नाट्यछटा, सुमधुर राष्ट्रभक्तीपर गीते आणि अंगावर शहारे आणणाऱ्या जोशपूर्ण मर्दानी खेळांच्या प्रात्यक्षिकांनी उपस्थितांची मने जिंकून घेतली. यानंतर विद्यार्थी आणि शिक्षकांनी स्वातंत्र्य, लोकशाहीची मूल्ये व नागरिकांची कर्तव्ये यावर आपली मनोगते व्यक्त केली.

यावेळी विद्यार्थ्यांनी एकता, शिस्त, प्रामाणिकपणा, समानता आणि सक्षम राष्ट्र घडविण्याची प्रतिज्ञा घेत विशेष शपथविधी पूर्ण केला. उपस्थित पाहुण्यांनी विद्यार्थ्यांच्या शिस्त, आत्मविश्वास आणि सादरीकरणाचे भरभरून कौतुक करत त्यांना देशसेवेसाठी प्रेरित केले.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी शाळेचे संचालक श्री. भूषण मावळे आणि मुख्याध्यापिका श्रीमती ज्योत्स्ना मावळे यांचे बहुमूल्य मार्गदर्शन लाभले. तसेच समन्वयक प्रतिभा पाटील, मोहना पंगनूरवार यांच्यासह नृत्य शिक्षिका प्रीती, संगीत शिक्षिका वर्षा आहेरकर, कला शिक्षिका सारिका चव्हाण, कांचन शिंदे आणि क्रीडा शिक्षिक मनीषा खेडकर, प्रफुल्ल प्रधान, सागर चव्हाण यांनी विद्यार्थ्यांच्या पूर्वतयारीसाठी विशेष परिश्रम घेतले.

पालक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सक्रिय सहभागाने आणि समर्पित प्रयत्नांमुळे हा ८० वा स्वातंत्र्यदिन सोहळा अत्यंत देखणा, प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरला.

# चऱ्होलीच्या ॲपेक्स स्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेजमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा!

» पिंपरी | प्रतिनिधी

**ॲपेक्स स्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेज, चऱ्होली येथे देशाचा ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला लेफ्टनंट कर्नल अमोल धुमाळ, माजी महापौर नितीन काळजे, नगरसेवक सचिन तापकीर, माजी नगरसेविका विनया तापकीर, संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याचे संचालक अतुल काळजे, माजी संचालक प्रवीण काळजे, सामाजिक कार्यकर्ते प्रकाश काळजे, संतोष पठारे, गणेश तापकीर, सोमनाथ घारे, सतीश पठारे,भाऊसाहेब रासकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.**



'वंदे मातरम्'च्या जयघोषाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. ध्वजारोहण व राष्ट्रगीत झाले. यावेळी विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध संचलन करत ध्वजास मानवंदना दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, नृत्य आणि नाट्यप्रयोग सादर केले. विद्यार्थ्यांच्या कराटे प्रात्यक्षिकांनी, कॅलिस्थेनिक व्यायाम प्रकारांनी तसेच लाठी-काठीच्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, शारीरिक कौशल्य आणि शिस्त यांचे दर्शन या सादरीकरणातून घडले. या प्रसंगी विद्यार्थ्यांना ट्रॅकसूटचे वितरणही करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक संतोष काळजे, दत्तात्रय वाळके, गणेश ठोकळ, राहुल टोणगे, मुख्याध्यापिका डॉ. मानसी गिल पंडित, उपमुख्याध्यापिका लीना तुगडे, विभागप्रमुख नीलम टोणगे आणि बालवाटिका विभागप्रमुख कोमल कदम उपस्थित होते.

लेफ्टनंट कर्नल अमोल धुमाळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना देशप्रेम, शिस्त, कर्तव्यभावना आणि राष्ट्राच्या प्रगतीतील योगदानाचे महत्त्व स्पष्ट केले. मुख्याध्यापिका डॉ. मानसी गिल पंडित यांनी स्वातंत्र्याचे महत्त्व अधोरेखित करत शिक्षणासोबतच संस्कार, शिस्त आणि जबाबदार नागरिकत्वाचे मूल्य आत्मसात करण्याचे आवाहन केले. यानंतर शिक्षकांचे मनोगत व विश्वस्तांचे मार्गदर्शन झाले. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.







# एसपीजी इंटरनॅशनल पब्लिक स्कूलमध्ये ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा!

» पिंपरी | प्रतिनिधी

**विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कायमच नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणाऱ्या नामांकित एसपीजी इंटरनॅशनल पब्लिक स्कूलमध्ये भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन अत्यंत दिमाखदार, शिस्तबद्ध आणि देशभक्तीमय वातावरणात उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक मा. श्री. सागर बाळासाहेब गवळी उपस्थित होते, तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. श्री. पांडुरंग नाना गवळी व मा. सौ. सुनीतामाई पांडुरंग नाना गवळी यांनी भूषविले.**

कार्यक्रमाच्या सुरुवातीला ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांचे विविध सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. यामध्ये इयत्ता ५ वी आणि ७ वीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेली देशभक्तीपर नृत्ये आणि श्री. विकी सर व श्री. सोहम सर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सादर केलेली शिस्तबद्ध परेड यांनी उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांना नृत्यासाठी सौ. रुपाली ससाणे, श्री. विकी सर, प्रेमलता मॅडम आणि भावना मॅडम यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी कॉलेजच्या प्राचार्या सौ. वैशाली यादव यांनी विद्यार्थ्यांना देशसेवेची प्रेरणा देणारे विचार मांडले.

या सोहळ्याचे औचित्य साधून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये इयत्ता १० वी आणि १२ वीच्या परीक्षेत ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देऊन विशेष सन्मान करण्यात आला. त्याचप्रमाणे १० वीच्या उत्कृष्ट निकालासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या शिक्षकांनाही सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. एकता जाधव मॅडम आणि निशा वाघमारे मॅडम यांनी केलेल्या आकर्षक सजावटीने संपूर्ण परिसर देशभक्तीच्या रंगात न्हाऊन निघाला होता.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी स्कूलचे प्राचार्य डॉ. प्रवीण गायकवाड, सौ. सुप्रिया मुळे, सौ. तैसीन मुलाणी, रेहान सर, डॉ. जयश्री सुरवसे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. संपूर्ण कार्यक्रमाचे प्रभावी व ओघवत्या शैलीतील सूत्रसंचालन सौ. मनीषा चव्हाण आणि सौ. अश्विनी मांजरेकर यांनी केले. शिस्त, संस्कृती आणि उत्साहाचा अनोखा संगम असलेला हा स्वातंत्र्य दिन सोहळा उपस्थितांसाठी अविस्मरणीय ठरला.

# पुण्यात 18 ते 31 ऑगस्टपर्यंत जमावबंदी; मोर्चे-रॅलींवर बंदी

## सणांच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांचा आदेश; पाच जणांच्या जमावासाठी परवानगी आवश्यक



**पिंपरी | प्रतिनिधी**

**आगामी सण, सामाजिक आणि राजकीय कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पुणे पोलिसांनी १८ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत प्रतिबंधात्मक आदेश लागू केला आहे. महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ मधील कलम ३७ (१), (२) आणि (३) अंतर्गत हा आदेश जारी करण्यात आला आहे. पोलीस उपआयुक्त (विशेष शाखा) डॉ. प्रशांत अमृतकर यांनी हा आदेश काढला आहे.**

पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत १८ ऑगस्ट रोजी मध्यरात्री १२.०१ वाजल्यापासून ३१ ऑगस्ट रोजी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत हे निर्बंध लागू राहणार आहेत. विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांकडून मोर्चे, आंदोलने, निदर्शने, बंद तसेच इतर कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यातून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी हा निर्णय घेतला आहे.

प्रतिबंधात्मक आदेशाच्या कालावधीत सार्वजनिक ठिकाणी ज्वलनशील, स्फोटक किंवा ज्वालाग्राही पदार्थ, दगड, शस्त्रे अथवा कोणालाही शारीरिक इजा पोहोचवू शकतील अशा वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे.

तसेच कोणत्याही व्यक्ती, नेता किंवा संस्थेचे पोर्ट्रेट, प्रतिकात्मक पुतळे अथवा मूर्ती सार्वजनिक ठिकाणी प्रदर्शित करणे किंवा जाळणे यावरही बंदी असेल. अश्लील, आक्षेपार्ह किंवा चिथावणीखोर घोषणा देणे, चिथावणीखोर गाणी म्हणणे, संगीत वाद्ये वाजवणे तसेच सामाजिक सलोखा आणि कायदा व सुव्यवस्थेला बाधा निर्माण करणाऱ्या कृती करण्यास मनाई करण्यात आली आहे.

या काळात सोशल मीडियावरून भीती पसरवणारे, धमकी देणारे किंवा कायदा व सुव्यवस्थेवर परिणाम करणारे डिजिटल साहित्य प्रसारित करण्यासही मनाई करण्यात आली आहे. गुन्हेगारांचे व्हिडिओ तयार करून ते प्रसारित करणे, भडकाऊ भाषणे किंवा सामाजिक सलोखा बिघडवणारी आक्षेपार्ह सामग्री शेअर केल्यास कारवाई केली जाऊ शकते, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.


या आदेशातील महत्त्वाची बाब म्हणजे पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा मेळावा, रॅली किंवा मिरवणूक आयोजित करण्यासाठी पुणे पोलीस आयुक्तांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहणार आहे. परवानगीशिवाय अशा कार्यक्रमात सहभागी झाल्यास संबंधित व्यक्तींवर कायदेशीर कारवाई होऊ शकते.

### उल्लंघन केल्यास कारवाई

**प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ मधील कलम १३५ अंतर्गत कारवाई केली जाणार आहे. आदेशाची मुदत संपल्यानंतरही उल्लंघनाशी संबंधित तपास, जप्ती, दंड किंवा इतर कायदेशीर प्रक्रिया सुरू राहू शकते, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.**

दरम्यान, कर्तव्यावर असताना शस्त्र बाळगण्याची परवानगी असलेल्या किंवा शस्त्र बाळगणे आवश्यक असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना या आदेशातून सूट देण्यात आली आहे. तसेच खासगी सुरक्षा रक्षक आणि पहारेकरी यांना कर्तव्यावर असताना साडेतीन फूट लांबीपर्यंतची काठी बाळगण्यास परवानगी देण्यात आली आहे.

# डेक्कन जिमखान्यात तरुणावर खुनी हल्ला; जुन्या वादातून शस्त्राने वार




**पिंपरी | प्रतिनिधी**

**डेक्कन जिमखाना परिसरातील एका हॉटेलसमोर १९ वर्षीय तरुणावर शस्त्राने वार करून खुनी हल्ला केल्याची धक्कादायक घटना शनिवारी (१५ ऑगस्ट) पहाटे घडली. या प्रकरणी डेक्कन पोलिसांनी दोन तरुणींसह एका तरुणाला अटक केली असून, त्यांच्यासोबत असलेल्या सात ते आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जखमी तरुणाने याप्रकरणी डेक्कन पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी तरुण आणि आरोपी तरुणी एकमेकांच्या ओळखीचे आहेत. काही महिन्यांपूर्वी सातारा येथे दोघांमध्ये भांडण झाले होते. याच जुन्या वादातून शनिवारी पहाटे हा प्रकार घडल्याची प्राथमिक माहिती पोलिस तपासात समोर आली आहे.

शनिवारी पहाटे सव्वातीनच्या सुमारास फिर्यादी तरुण हॉटेलमधून बाहेर पडत होता. त्यावेळी आरोपींच्या टोळक्याने त्याला रस्त्यात अडवले. 'तू तरुणींना काय बोलला? आमच्याबरोबर चल, तुला दाखवितो,' अशी धमकी देण्यात आली. या प्रकारामुळे घाबरलेल्या तरुणाने तेथून हॉटेलमध्ये धाव घेतली.

यानंतर आरोपी तरुणी आणि तिच्या साथीदारांनी तरुणाला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. तसेच 'याला मारा, जिवंत सोडू नका,' अशी धमकी देत त्याच्या डोक्यात शस्त्राने वार केला. एवढ्यावरच न थांबता हल्लेखोरांनी हॉटेलमधील खुर्ची त्याच्यावर फेकून मारली. तसेच लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या हल्ल्यात तरुणाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर डेक्कन पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. या प्रकरणात पोलिसांनी दोन तरुणी आणि एका तरुणाला अटक केली आहे. त्यांच्यासोबत असलेल्या सात ते आठ साथीदारांविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांच्या भूमिकेचा तपास सुरू आहे.

डेक्कन जिमखाना परिसरात पहाटेच्या वेळी हॉटेलसमोर झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. या भागातील काही हॉटेल्स रात्री उशिरापर्यंत सुरू असतात. त्यामुळे यापूर्वीही काही ठिकाणी वाद आणि भांडणांच्या घटना घडल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून परिसरातील हॉटेल्स आणि रात्रीच्या वेळी होणाऱ्या हालचालींवर लक्ष ठेवले जात आहे.

पोलिसांकडून अटक करण्यात आलेल्या आरोपींची चौकशी सुरू असून, हल्ल्यामागील नेमके कारण, सहभागी असलेल्या इतर व्यक्तींची भूमिका आणि वापरण्यात आलेल्या शस्त्राबाबत तपास केला जात आहे. या प्रकरणातील फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू आहेत.

# काश्मीर सफरचंद हंगाम लवकर संपणार!

## हवामानाचा फटका; कॉर्पोरेट खरेदीमुळे दुय्यम मालाची आवक

**पिंपरी | प्रतिनिधी**

**पुणे बाजार समितीमध्ये काश्मीर आणि हिमाचल प्रदेशातील सफरचंदाचा हंगाम गेल्या १५ दिवसांपासून सुरू झाला आहे. श्रावण महिना आणि आगामी गणेशोत्सवाच्या काळात सफरचंदाची मागणी आणि आवक वाढण्याची शक्यता आहे. मात्र, यंदा हवामानातील बदलामुळे उत्पादनात मोठी घट झाली असून, त्याचा परिणाम बाजारातील आवकेवर झाला आहे. त्यामुळे दरवर्षी साधारण अडीच महिने चालणारा सफरचंदाचा हंगाम यंदा अवघ्या महिनाभरातच संपण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.**



अडते करण जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, यंदा सफरचंदाच्या उत्पादनावर हवामानाचा मोठा परिणाम झाला आहे. त्यामुळे उपलब्ध मालाचे प्रमाण कमी झाले आहे. दरवर्षी जुलैअखेर सुरू होणारा हिमाचल प्रदेशातील सफरचंदाचा हंगाम ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत सुरू राहतो. मात्र यंदा कमी उंचीच्या भागातील सफरचंदाच्या बागांना मोठा फटका बसला आहे.

कमी उंचीवरील भागातील सफरचंदाचा हंगाम आता संपत आला असून, त्यातील सुमारे ९० टक्के माल अत्यंत लहान आकाराचा असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. सध्या मध्यम उंचीवरील भागातील सफरचंद बाजारात येत असून, हा हंगाम साधारण १५ दिवस सुरू राहण्याची शक्यता आहे. त्यानंतर अधिक उंचीच्या भागातील सफरचंदाची आवक सुरू होईल. मात्र एकूण उत्पादन कमी असल्याने सप्टेंबरअखेरपर्यंत हंगाम संपण्याची शक्यता आहे.

दरम्यान, काश्मीरमधील 'गाला' जातीच्या सफरचंदाची आवक यंदा नेहमीपेक्षा लवकर सुरू झाली आहे. दर्जानुसार या सफरचंदाला बाजारात चांगली मागणी मिळत आहे. श्रावण आणि गणेशोत्सवाच्या काळात फळांना मागणी वाढत असल्याने सफरचंदाच्या विक्रीतही वाढ होण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

सफरचंदाच्या बाजारपेठेत मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांची थेट खरेदीही वाढली आहे. रिलायन्स, अदानी, जेमट्री, ब्लिंकिट, महिंद्रा आणि जेएसओ यांसारख्या कंपन्या शेतकऱ्यांच्या बागेत जाऊन थेट सफरचंद खरेदी करत आहेत. सध्या या कंपन्यांकडून ट्रेमध्ये सरासरी १२० रुपये प्रति किलो दराने माल खरेदी केला जात असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

अत्याधुनिक ग्रेडिंग मशीन आणि सेन्सरच्या माध्यमातून या कंपन्या उच्च दर्जाचा 'ए ग्रेड' माल निवडून घेतात. उर्वरित माल शेतकऱ्यांकडेच राहतो. हा माल शेतकरी पॅक करून देशातील विविध घाऊक बाजारपेठांमध्ये पाठवत असल्याने बाजार समित्यांमध्ये सध्या तुलनेने दुय्यम दर्जाच्या सफरचंदाची आवक अधिक होत असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

यंदाचा सफरचंदाचा हंगाम मागील १५ ते २० वर्षांच्या तुलनेत अत्यंत खराब असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. हवामानातील बदलामुळे उत्पादनात घट झाली असून, लहान आकाराच्या फळांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना उत्पादन आणि बाजारपेठ या दोन्ही पातळ्यांवर आव्हानांचा सामना करावा लागत आहे.

पुणे बाजार समितीमध्ये हिमाचल प्रदेशातील सफरचंदाच्या २४ ते २५ किलोच्या बॉक्सला प्रतवारीनुसार २ हजार ते ४ हजार रुपये असा घाऊक दर मिळत आहे. तर किरकोळ बाजारात सफरचंदाची विक्री सध्या २०० ते २२५ रुपये प्रति किलो दराने होत आहे.

यंदा उत्पादन घटल्याने पुढील काळात बाजारातील आवक कमी राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे सणासुदीच्या काळात सफरचंदाच्या मागणीत वाढ झाल्यास किरकोळ बाजारातील दरावरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# पुण्यात BSNLचा नेटवर्क बूस्टर; ७०० टॉवर्स अपग्रेड होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

**भारत संचार निगम लिमिटेडने (BSNL) पुणे शहरातील मोबाइल कनेक्टिव्हिटी अधिक सक्षम करण्यासाठी मोठे पाऊल उचलले आहे. शहरातील तब्बल ७०० मोबाइल टॉवर्सचे अपग्रेडेशन करण्यात येणार असून, ग्रामीण भागातील १०३ टॉवर्सचाही यामध्ये समावेश आहे. यासोबतच नेटवर्क उपलब्ध नसतानाही संपर्क साधता येणारा विशेष सॅटेलाईट मोबाईल बीएसएनएलकडून लाँच करण्यात आला आहे.**



पुणे बीएसएनएलचे महाव्यवस्थापक (मोबाईल) अतुल वाखले यांनी पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली. देशभरातील नागरिकांना अधिक चांगली कनेक्टिव्हिटी देण्यासाठी बीएसएनएलकडून विविध स्तरांवर काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

देशभरात एक लाख टॉवर्सचे अपग्रेडेशबीएसएनएलकडून सध्या फोरजी नेटवर्कची क्षमता वाढविण्याचे काम सुरू आहे. यासाठी टीसीएस, सी-डॉट, तेजस यांसारख्या कंपन्यांची मदत घेतली जात आहे. देशभरात सुमारे एक लाख मोबाइल टॉवर्सचे अपग्रेडेशन करण्यात येणार आहे. त्यापैकी पुणे शहरातील ७०० आणि ग्रामीण भागातील १०३ टॉवर्सचा समावेश आहे.

या अपग्रेडेशनमुळे नेटवर्कची गुणवत्ता आणि कनेक्टिव्हिटी सुधारण्यास मदत होणार असून, भविष्यातील फाईव्ह-जी तंत्रज्ञानासाठीही यंत्रणा अधिक सक्षम करण्याच्या दिशेने बीएसएनएलचे प्रयत्न सुरू आहेत.

बीएसएनएलने आपत्कालीन परिस्थितीसाठी विशेष सॅटेलाईट मोबाईल लाँच केला आहे. सुमारे १ लाख ३४ हजार १६६ रुपये किंमत असलेला हा मोबाईल सर्वसामान्य ग्राहकांसाठी उपलब्ध नसणार आहे. नेटवर्कची सुविधा नसलेल्या ठिकाणीही संपर्क साधता यावा, या उद्देशाने हा मोबाईल विशेष यंत्रणांसाठी तयार करण्यात आला आहे.

**'या' व्यक्ती आणि संस्थांना मिळणार सुविधा**

सॅटेलाईट मोबाईलचा वापर देशाच्या सीमेवर कार्यरत असलेले सैनिक, आपत्कालीन सेवा देणाऱ्या संस्था आणि विविध सुरक्षा यंत्रणा करू शकणार आहेत. याशिवाय गिर्यारोहण करणाऱ्या संस्था, समुद्रात काम करणारे मच्छीमार, जहाज कंपन्या, दुर्गम भागात जाणाऱ्या पर्यटकांच्या यंत्रणा, इव्हेंट कंपन्या आणि शासनाच्या विशेष आपत्कालीन यंत्रणा यांनाही या सुविधेचा लाभ मिळणार आहे.

दुर्गम भागात नेटवर्क उपलब्ध नसल्याने अनेकदा संपर्क साधण्यात अडचणी येतात. अशा परिस्थितीत सॅटेलाईट मोबाईल महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. विशेषतः नैसर्गिक आपत्ती, बचावकार्य किंवा आपत्कालीन परिस्थितीत संपर्क व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी या सुविधेचा उपयोग होणार आहे.

पुणे शहरासह ग्रामीण भागातील टॉवर्सच्या अपग्रेडेशनमुळे बीएसएनएलच्या ग्राहकांना नेटवर्कच्या बाबतीत अधिक चांगली सुविधा मिळण्याची अपेक्षा आहे. एकीकडे नियमित मोबाइल नेटवर्क मजबूत करण्याचे काम सुरू असताना दुसरीकडे नेटवर्कच्या बाहेरील भागांसाठी सॅटेलाईट मोबाईलची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे पुण्यासह राज्यातील दुर्गम भागातील संपर्क व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे.